


# माध्यमविद्या

कोल्हापूर, दि. २६ जानेवारी २०२०

खासगी वितरणासाठी

# समाज उभारणीत विद्यार्थी भवनचे योगदान

## शिक्षण, राजकारण, प्रशासन, उद्योग आदी क्षेत्रात विद्यार्थ्यांनी उमटवला ठसा

**कोल्हापूर : विनायक लोहार**

प्राध्यापक,कुलगुरु ते सरकारी अधिकारी घडवणारी शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका योजना सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. काम करुन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ती आधारवड ठरली असून, आजपर्यंत सुमारे ४५०० हजार विद्यार्थ्यांनी योजनेतून आपल्या व्यक्तिमत्वाला आकार दिला आहे. प्रशासकीय पातळीवर योजनेचा सुवर्ण महोत्सव दिमाखात साजरा करण्यासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत.

विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून आजतागायत अर्ध्या शतकाहून जास्त काळात ज्या प्रकल्पांचा उल्लेख केल्याशिवाय विद्यापीठाशी संबंधी कोठे?कोणी?केव्हा? चाललेली चर्चा पूर्ण होत नाही त्यातीलच एक प्रकल्प म्हणजे डॉ.आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन कमवा व शिका योजना.

पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी १९६८ साली कमवा व शिका योजनेची सुरुवात केली. कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर तसेच इतर जिल्ह्यातील विद्यार्थी जे आर्थिक दृष्ट्या मागास आहेत.अशा विद्यार्थ्यांना या ठिकाणी प्रवेश दिला जातो. विद्यार्थी भवनाचा आराखडा किंवा आर्किटेक्चरला प्लॅन देखील कोण्या अनुभवी इंजिनीयर कडून नव्हे. तर वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या एका विद्यार्थ्यांनी एका कल्पनेतून तयार केला. या विद्यार्थी भवन ला (कमवा व शिका योजना) विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन हे नाव देण्यात आले आहे. . अतिशय स्वच्छ,सुंदर वातावरण असून भवनची शिस्त ,नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. जिद्द ,चिकाटी, प्रामाणिकपणे भवन चे विद्यार्थी आपले काम पार पाडत असतात. सुरुवातीला या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना शेतीची कामे तसेच गिरण चालवणे, हॉटेल चालवणे अशी कामे दिली जात होती. आता सध्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना खासकरून विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना उद्यान विभागांमध्ये काम दिले जाते. कला व वाणिज्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांना ऑफिस काम, झेरॉक्स किंवा ग्रंथालयामध्ये पुस्तक वितरणाचे काम किंवा पुस्तक देवाण घेवाण करण्याचे काम दिले जाते. सामाजिक,सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जातो. विद्यार्थी भवनामार्फत वेगवेगळे पर्यावरणपूरक कार्यक्रम राबविण्यात येतात. **(पान चारवर)**




### भवनने साजरा केला सुवर्णमहोत्सव

२०१८-१९ हे वर्ष विद्यार्थी भवनचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. याच वर्षी विद्यार्थी भवन ला ५० वर्षे पूर्ण झाली. सुवर्णमहोत्सवानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करून सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. या विद्यार्थी भवनातून जे विद्यार्थी बाहेर पडले त्यापैकी अनेकांनी आपल्या आयुष्यामध्ये नेत्रदीपक कामगिरी करून दाखविली आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात मिळेल त्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थी भवन चे १९६८ पासून ते २०१९ पर्यंत ४५०० ते ५००० च्या आसपास विद्यार्थी शिकून बाहेर पडले आहेत. तसेच दरवर्षी ३० डिसेंबर रोजी डॉ. आप्पासाहेब पवार यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. या निमित्ताने वृक्षारोपण व इतर सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

### कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आज ध्वजारोहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारताच्या ७१ व्या प्रजासत्ताकदिनानिमित्त रविवार दि. २६ जानेवारी २०२० रोजी सकाळी ८ वाजता विद्यापीठाच्या आवारात मुख्य कार्यालयासमोर कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहन होणार आहे. या समारंभाला शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व अधिविभागातील विद्यार्थी, विद्यार्थिनी आदींनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आर्थिक, सामाजिक लोकशाहीवर राजकीय लोकशाहीचे भवितव्य

## डॉ. सुखदेव थोरात यांचे मत : समाजशास्त्र अधिविभागाचा सुवर्णमहोत्सव दिमाखात

**कोल्हापूर : अशपाक पठाण**

राजकीय लोकशाही ही आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीवर अवलंबून असते. समाजामधील गरिबांनाही लोकशाही प्रणालीमध्ये भाग घेण्यासाठी सध्याच्या प्रणालीमध्ये योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. परदेशांमध्ये असे बदल अवलंबले जात आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग व भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागामार्फत अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्षाचे औचित्य साधून रशियन सोशिओलॉजिकल सोसायटी, साऊथ अफ्रीकन सोशिओलॉजिकल सोसायटी, एशिया क्लायमेंट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरिया, इंटरनॅशनल सोशिऑलॉजीकल सोसायटी आणि इंडियन सोशिऑलॉजीकल सोसायटी यांच्या सहकार्याने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर विद्यापीठात तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के होते. यावेळी, भारतीय समाजशास्त्र परिषदेचे सचिव डी. आर. साहू, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, सामाजिकशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता डॉ.भारती पाटील, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.पी. एस. पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संशोधकही उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, समाजामध्ये समानता मिळविण्याच्या प्रयत्नांमध्ये प्रत्येकास समान संधी आहे. त्यासाठी समान अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. राज्यघटनेच्या प्रस्तावनेमध्ये समानता आणि स्वातंत्र्य याबाबत अगदी स्पष्टपणे लिहिलेले आहे. त्यामुळे समान नागरी हक्क, समान राजकीय अधिकार, समान मूलभूत अधिकर लोकांना देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समाजामध्ये निर्माण झालेली **(पान चारवर)**

# शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वेळेत बदल

**कोल्हापूर : भाग्यश्री सुगंधी**

शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वेळेत विद्यार्थी तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी बदल करण्यात आला आहे. पूर्वी सकाळी आठ ते दुपारी बारा अशी वेळ होती. त्याऐवजी आता सकाळी साडेआठ ते दुपारी साडेबारा अशी वेळ करण्यात आली आहे. या काळात विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात तपासणी केली जाणार आहे.

विद्यापीठाचे आरोग्य केंद्र हे विद्यापीठातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्याबरोबर सर्व विभाग आणि कर्मचारी यांना आरोग्य तसेच वैद्यकीय सेवा माफक दरामध्ये पुरविते. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आरोग्य केंद्राच्या वेळेमध्ये बदल करण्यात आला आहे. याची नोंद सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी तसेच विविध विभागातील कर्मचारी यांनी घ्यावी, असे आवाहन आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी दिली. या नव्या वेळेची अंमलबजावणी दि. २ डिसेंबर २०१९ पासून सुरू केली आहे. सकाळी ०८.०० ते ०९.०० या वेळेत खूप कमी रूग्ण उपचारासाठी येत होते. परंतु दुपारी बारा वाजता आरोग्य केंद्रातील सेवा बंद होत असताना रूग्ण उपचारासाठी येत होते. यायाच अर्थ सकाळच्या वेळी रुग्णांना आरोग्य केंद्रात येणे जमत नाही. त्यामुळे वेळ बदलून देण्याचा विचार पुढे आला होता. त्यानुसार आरोग्य केंद्राची नवीन वेळ सकाळी ८:३० ते दुपारी १२.३० पर्यंत आणि दुपारी ०३.२० ते संध्याकाळी ०६.३० पर्यंत केली **(पान चारवर)**

### रूग्णांची संख्या वाढली : डॉ. रानडे

यापूर्वी सकाळ आठ ते दुपारी बारा या वेळेत रूग्णांची तपासणी केली जात होती. सकाळच्या वेळी रूग्ण आरोग्य केंद्रात येण्याचे प्रमाण कमी होते. तपासणीची वेळ सकाळी साडेआठ ते दुपारी साडेबारा केल्यानंतर आरोग्य केंद्रात येणाऱ्या रूग्णांचे प्रमाण वाढले आहे. सकाळी दहानंतर येणाऱ्या रूग्णांचे प्रमाण जास्त आहे, अशी माहिती आरोग्य अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी दिली.